# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : 022-2261 8987
022-2270 8738
Email ID : supt.statunit@gmail.com


**स्मरणपत्र**

**अति महत्वाचे**


सांख्यिकी कक्ष,
फोर्ट, मुंबई- ४०० ०३२.


**No.UDSTAT/ICD/2017-18/AISHE/153 of 2018**

**परिपत्रक :-**

विषय : अखिल भारतिय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ बाबत.

संदर्भ : १) क्र. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१७-१८/३८५, दिनांक ९ जानेवारी, २०१८
२) No.UDSTAT/ICD/2017-18/AISHE/138 of 2018, दिनांक ११ जानेवारी, २०१८

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांचे संबंधित परिपत्रकाकडे लक्ष वेधू इच्छितो की, राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी व सर्व महाविद्यालये/संस्था यांचे सर्वेक्षणामध्ये समावेश होण्याच्या दृष्टीकोनात विचार करता अत्यावश्यक असलेली ऑनलाईन माहिती त्यांनी दिलेल्या वेब पोर्टलवर नोंदविणे आवश्यक आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाकरिता संचालनालयाकडून सुचीत केल्याप्रमाणे अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण AISHE कार्यक्रम हा संचालक, मानवसंसाधन विकास (MoHRD) नवी दिल्ली, निर्मित सर्वेक्षणाच्या कामकाजाबाबत आपणास विचारण्यात आलेली माहिती ही अत्यंत महत्वपुर्ण व शासनास पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी उपयुक्त असल्याने ती आपल्या मार्फत त्वरीत सादर करणे गरजेचे आहे.

**अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम AISHE :-**

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ वर्षाकरीता संचालनालयाकडून विचारण्यात आलेली Online पद्धती नुसार 1) College Institution Form - DCF - II (Attached to University) महाविद्यालये व संस्था यांच्याकडून मागविलेली माहिती, 2) Other Minority Form - DCF-IV- महाविद्यालये व संस्था यांच्याकडे असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या नोंदणी बाबत व 3) Teachers Information Format- TIF शिक्षकांबाबतची माहिती ही संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याच्या हेतूने व कार्यालयीन कामाची योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्याच्या हेतूने ती दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत संचालनालय/विद्यापीठास विनाविलंब सादर करणे आवश्यक आहे.**

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता आपल्या असे निदर्शनास आणून देवू इच्छितो की, शैक्षणिक वर्षे २०१७-१८ या सालाकरीता संचालनालयामार्फत विचारण्यात आलेली सर्वेक्षणात्मक AISHE ऑनलाईन माहिती ही उपरोल्लेखित केलेल्या दिनांकास (२८/०२/२०१८) सादर करणे अत्यंत गरजेचे व अनिवार्य आहे. अन्यथा आपल्या महाविद्यालयाची उल्लेखित केलेली संबंधित माहिती MHoRD, New Delhi संचालनालयास वेळेत/विनाविलंब सादर न झाल्यास महाविद्यालयातील आपण प्राचार्य/संचालक या नात्याने आपली सर्वस्वी जबाबदारी राहिल, याची खात्रीपुर्वक जाणीव ठेवून आपल्या महाविद्यालयातील नोडल अधिकारी आणि संबंधित ऑनलाईन माहिती भरणारे कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देणे योग्य ठरेल.

| |
|---|
| टिप्पणी : AISHE व Students on Roll या कार्यक्रमाबाबतची ऑनलाईन माहिती त्वरीत भरून सदर कक्षामार्फत दिनांक २८/०२/२०१८ पर्यंत कोणतीही सबब न दाखविता प्रमाणपत्र/हमीपत्र घेवून जाणे. |

नोडल अधिकारी,
**(AISHE/MIS Cell)**

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १६/०२/२०१८

Scanned by CamScanner

# मुंबई विद्यापीठ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवानाः-

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई-४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
५. उपकुलसचिव, पदवुत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ(पूर्व),मुंबई-४०० ०९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ(पूर्व),मुंबई-४०० ०९८.

**यांना असे कळविण्यात येते की, AISHE बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिर्वाय असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालय/संस्थेच्या विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज (Exam.Form) व नोंदणी अर्ज (Enrollment Form)महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension) /प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval) व महाविदयालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे, व मा. कुलगुरू, मुबंई विद्यापीठ यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थेकडून त्याबाबतचे प्रमाणपत्राची छायांकीत प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील कार्यालयीन कार्यवाही करावी.**

**नोडल अधिकारी,**
**(AISHE/MIS Cell)**

Scanned by CamScanner